# "स्वातंत्र्यपूर्व काळातील दलित चळवळ आणि डॉबाबासाहेब आंबेडकर"

**डॉ.परदेशी सुनिल लक्ष्मण** महात्मा फुले.ए.एस.सी.कॉलेज, पनवेल,जि .रायगड मो. ९१३७२८०२३९

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्वांचा आधार घेतला व जातिव्यवस्थेच्या विरोधी चळवळ सुरू केली. आंबेडकरांच्या विचारांवर आधारित ज्या चळवळी सुरू झाल्या त्याला आपण आंबेडकरवादी दलित चळवळ म्हणतो. महाराष्ट्रामध्ये १८१८ मध्ये पेशव्यांची सत्ता नष्ट झाली व ब्रिटिशांची सत्ता महाराष्ट्रामध्ये निर्माण झालीब्रिटिशांनी मुलांच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या. या शाळेला ब्राह्मण लोकांनी विरोध केला तेव्हा महात्मा फुले यांनी पुण्यामध्ये१८४८ मध्ये पहिली मुलींची शाळा सुरू केली आणि खऱ्या अर्थाने बहुजन समाजामध्ये शिक्षणाला सुरुवात झाली.

**दलित चळवळ:-** भारतामध्ये ब्रिटिशांची सत्ता निर्माण झाली. अनेकांनी सामाजिक व्यवस्थेमध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला त्यामध्ये महाराष्ट्रामध्ये सर्वात अगोदर लोकहितवादी, दादोबा पांडुरंग, तर्खडकर , न्यायमूर्ती रानडे ,विष्णुबुवा ब्रह्मचारी, रामकृष्ण भांडारकर, बाबाजी पद्मजी, महात्मा फुले ,विठ्ठल रामजी शिंदे, राजश्री शाहू महाराज, महाराज सयाजीराव गायकवाड, गोपाळ बाबा वलंगेकर, शिवराव जानबा कांबळे ,किसन बनसोडे यांनी समाज सुधारण्याचे काम केले यातूनच पुढे आंबेडकर पूर्व दलित चळवळ ही उदयास आली.

'दलित' हे पद फार बोचक होते. दलित हे पद जातिवाचक नव्हते, पण बहुसंख्य समिक्षकांणी 'दलित' हे पद जातीवाचक करून घेतला. दलित या पदाबद्दल मतमतांतरे फारच आहेत. एवढे मात्र खरे आहे की, या देशातील अर्थव्यवस्थेने आणि समाज व्यवस्थेने ज्यांना माणूसपण नाकारले आणि ज्यांच्या वाटयाला फक्त शोषणाची दु:खे आली त्या सर्वांना 'दलित' हे पद संबोधलेले दिसते[१]. रूढीच्या किंवा खोटया धर्मकल्पनाच्या आहारी जाऊन या देशातील समाजाने कोटयावधी लोंकाना अस्पृश्य ठरविले अस्पृश्यता पाळणे हाच आपला धर्म अशी समजूत मनात ठेवून पिढयानपिढया एका मोठया समाज घटकाला अन्यायाने वागिले हा मानवतेवरील कलंक आहे[२].अस्पृश्यता ही भारतीय समाजाला लागलेली किड आहे. अस्पृश्यतेमूळे कोटयावधी लोक, मानसासारखी माणसे असूण देखील त्यांना कुत्रा ,मांजरा पेक्षा कमी लेखले[३]. परिवर्तनाला आवश्यक अशी अटळ प्रक्रिया असते ती म्हणजे समग्र दर्शन मांडण्याचा उपक्रम करण्याची राजाराम मोहन रॉय यांच्यापासून सुरूवात झाली[४].दलितांला आत्मभान आले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या विचारामूळे आणि त्यांनी सूरू केलेल्या मुक्तीसंग्रामामुळे दलिताचा आत्मापुर्नजन्म,वेद,उपनिषदे—गीता यातील विषमतेचा विचार कर्मफल सिध्दात, दैव, स्वर्ग-नरक इ. विश्वास नाही. त्याचा विश्वास आहे माणसावर आणि विश्वरचनेतील माणसाच्या श्रेष्ठत्वावर[५]. आर्य संस्कृती श्रेष्ठ मानून तिला उराशी बाळगण्यात अर्थ नाही या संस्कृतीचा मानवीश्रेष्ठपणाचा हा निवळ भ्रम आहे. आजची अमानुष हिंसावृत्ती त्याच्या यज्ञसंस्थेत चांगली प्रतीत होते. एका एका यज्ञात पाच-सातशे पशू धर्माच्या नावाखाली मारले जात. आर्य लोक सोमपान करणारे असत. त्यांच्याइतके दारू पिणारे क्वचितच पाहायला मिळत असत.ते शूद्रांना तुच्छ मानीत असत व स्रियांना शूद्रांनपेक्षा हीन मानीत असत .आर्य लोकांनी चार वर्ण करून समाजाचे तुकडे केले.भगवान बुद्धांनी ही दुखे सुधारण्याचा प्रयत्न केला .त्यांनी यज्ञ संस्थेला विरोध केला व मद्यपानावर बंदी घातली.

**दलित चळवळीचा इतिहास** :-महाराष्ट्राच्या समाजव्यवस्थेचा विचार करताना जाती,वतन ,समाजिक चालीरीती यांचा विचार करावा लागतो .ग्रामीण भागातील बलुतेदार व अलुतेदार हा ग्रामीण समाज्याचे अंग समजले जाई जात ही श्रमविभागणीची व व्यवसायाधिष्ठीत स्तरीकरणाची व्यवस्था होती. तिचा उदय उत्तर वैदिक काळातील वर्णच्यवस्थेतून झाल्याचे मानले जाते.वर्णव्यवस्था ही गुणाच्या आधारित होती. जाती व्यवस्थेमध्ये जन्म हा आधार मानला जातो.प्रत्येक जात आपल्यापेक्षा खालच्या जातीला दुय्यम मानीत असत. यामध्ये अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या जातीजमातीची स्थिती दयनीय होती केवळ उच्च जाती-जमातीची सेवाकरणे ऐवढेच त्याचे काम होते[६].समाजातील प्रत्येक घटकाला समान न्याय मिळाला पाहिजे ही संकल्पना इंग्रजानी प्रथम आणली. ब्रिटीशानी सैन्यात अस्पृश्यांना प्रवेश मिळाल्यमे त्यांच्यात सामाजीक अस्मिता जागी झाली. इंग्रजाच्या काळात शिक्षण, नोकरीची संधी मिळाली त्याना अस्पृश्यता व गुलामगिरीची जाणीव होऊन त्यातूण महाराष्ट्रात दलित चळवळ मोठया प्रमाणात विकसीत झाली. दलित चळवळीचे तीन टप्पे आहेत [७].डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्व दलित चळवळ,डॉ बाबासाहेब आंबेडकरकालीन दलित चळवळ ,डॉ बाबासाहेब आंबेडकरनंतरची दलित चळवळ.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्व दलित चळवळ:-** महाराष्ट्राच्या समाज व्यवस्थेमध्ये बदल घडून आणण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले व त्यामध्ये त्यांना काही प्रमाणत यश मिळालेले दिसून येते.

**महात्मा फुले:-** जाती व्यवस्थेमधूण निर्माण झालेला अस्पृश्यतेचा प्रश्न सोडविण्यासाठी संपूर्णसमाज रचनेची पुर्नमांडणी करणे हा विचार सर्व प्रथम म. फुले यांनी मांडला. १८६८ मध्ये स्वतःच्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद अस्पृश्यासाठी खुला करून परंपरागत रूढींना

धक्का दिला. कृष्णराव भालेकर यांच्या मदतीने पुण्यात 'दीनबंधू' हे वृत्तपत्र १८७७ मध्येसुरू केले.त्यातून सामाजिक रूढी, परंपरावर टिका आणि अस्पृश्यांच्या परिवर्तनाचे कवचारमांडून लोकजागृतीचे कार्य करण्यात आले म. फुल्यांनी आपल्या मित्रांच्या सहकार्याने 'अस्पृश्य लोकांस विद्या शिकवण्याकरीता मंडळ" नावाची संस्था स्थापन केली.

**गोपाळ बाबा वलंगकर** :- दलित समाजातील अनेक युवकांना त्यांनी प्रभावीत केले म फुले यांच्या विचारांचामोठा प्रभाव होता १८९० मध्ये दापोली येथे 'अनार्य दोष परिहार समाज स्थापन केला"विटाळ विध्वसन' प्रसिध्द केला. पहिले दलित वृत्तपत्र वार्ताहार म्हनून ते ओळखले जाते.१८५१ मध्ये पुण्यात अस्पृश्यासांठी पहिली शाळा सुरू केली

**शिवराय जानबा कांबळे** :-वलंगकर यांच्या विचारांचा प्रभाव शिवराय कांबळे यांच्यावर पडला ते पुण्याचे रहिवासी होते त्यानी 'मराठा', 'दीनबंधु' या वृत्तपत्रात पहिला लेख १९०२ मध्ये प्रसिद्ध केला.१९०४ मध्ये 'श्री शंकर प्रासाविक सोमवंशीव हितचिंतक मित्र समाज' या संस्थेची स्थापना केली. यामधूण अस्पृश्य लोकांना लष्कर व पोलिस खात्यात नोकऱ्या मिळाव्यात व त्यांच्या मूलांचे शिक्षण सरकारने करावे यासाठी शाळा व वाचनालय सुरू करण्यासाठी संस्थेची स्थापना केली

**छ. शाहू महाराज :-** म. फुले यांच्या विचाराचा प्रभाव राजे शाहू महाराज यांच्यावर होता कोल्हापूर संस्थानामध्ये इस. १९०२ मध्ये सरकारी नोक-यामध्ये ५० टक्के जागा मागासवर्गीयासाठी राखूण ठेवल्या. महार वतन रद्द करून त्या जमिनी अस्पृश्याच्या नावावर करून दिल्या .वेठबिगारी रद्द करून वेठबिगारी कामे करून घेण्यास बंदी घातली. १९२० मध्ये पहिली 'मूकनायक' या पहिल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साप्ताहिकास आर्थिक मदत केली. अस्पृश्य परीषद भरवली, अस्पृश्य मुलांसाठी शाळा व वसतिगृहसुरू केले.

**सयाजीराव महाराज गायकवाड** :-बडोद्याचे सयाजीराव महाराज हे परिवर्तनवादी विचाराचे पुरस्कर्ते होते त्यानी डॉ. आंबेडकराना शिष्यवृत्ती देऊन इंग्लंड व अमेरिकेला पाठविले 'अस्पृश्यता निवारण ' पहिली परिषद मुंबईला २३ मार्च १९१८ रोजी भरवली होती त्याचे अध्यक्ष सयाजीराव महाराज गायकवाड हे होते.

**विठ्ठल रामजी शिंदे :-**प्रार्थना' समाजाचे प्रचारक व अस्पृश्य वर्गाची सुधारणा व्हावी म्हणुन१२ आक्टोबर१९०६ रोजी "डिस्पेड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया" या संस्थेची स्थापना मुंबईत केली. पहिली शाळा १२ आक्टोबर १९०६रोजी सुरू केली. ठाणे, मालवण,अमरावती, अकोले इ. ठिकाणी शाळा व वसतिगृह सुरू केले १९१२ मध्ये पुण्यात फर्ग्युसन कॉलेज येथे अस्पुश्य व ब्राम्हण यांच्यात एकत्र सहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

**किसान फागुजी बनसोडे:-** किसान बनसोडे यांचा जन्म नागपूर जिल्ह्यात झाला.अस्पृश्यांची शैक्षणिक,आर्थिक प्रगती व्हावी यासाठी 'सन्मान बोधक निराप्रीतयमाज' स्थापन केला.सहकार्याच्या मदतीने 'चोखामेळा सुधारक मंडळ 'व 'वाचन मंडळ ' स्थापन केले.अस्पृश्य लोकांला संधी उपलब्ध करून दिली .गणेश अक्काजी गवई,कालीचरण नंदा गवळी इ .यांचेही आंबेडकरपर्व चळवळीतील कार्य महत्वाचे आहे .

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरपुर्व दलित चळवळीचे साहित्य :-**

गोपाळबाबा वलंगकर याचे 'विटाळ विध्वसक' (१८८८), किसनफागुजी बनसोडे यांची विटाळ विध्वसंक(१९०२), निराश्रित हिंद नागरिक (१९१३), मजुरपत्रिका (१९१८), चोखामेळा (१९३१) ही नियतकालिके, शिवराम जानबा कांबळे याचे सोमवंशीय मित्र (१९०९), गणेश आक्काजी गवई यांचे बहिष्कत भारत (१९२०).चळवळीचा प्रसार करण्याचे व लोकजागृती करण्याचे काम एक मुख्य साधन आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरपुर्व दलित शाहिर :-**या काळात महाराष्ट्रात लोकजागृतीचे कार्य वेगाने घडले. शाहिर केरू अर्जुन घेंगडे,केरूबुवा गायकवाड, पतीतपावन दास, दिनबंधू, राजानंद गडपायले, वामनदादा कर्डक,श्रावण यशवंत इ[८].

**मुल्यमापन :-**हजारो वर्षापासून मानवी हक्कापासूण वंचित असणऱ्या बहुसंख्य अस्पृश्य दलितचळवळीने न्याय मिळवुण दिला, माणूस म्हणून जगण्यासछी दलितामध्ये आत्मविश्वास व स्वाभिमान निर्माण केला. दलित चळचळीने शिक्षणाचा प्रसार व प्रचार केल्यामुळे सामाजिक प्रतिष्ठेत बदल घडवून आणला दलिताच्या सर्वागीण विकासाला चालना मिळाली. एकक्रांतिकारी परिवर्तनवादी चळवळ म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासात दलित चळवळीचे योगदान आहे. महाराष्ट्रात लोकजीवनात जोपर्यत सामाजिक आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिकव सांस्कृतिक अशा विविध प्रकारची विषमता आहे तो पर्यत दलित चळवळीची आवश्यकता आहे. जोपर्यत दलिताचा उध्दार व विकास होत नाही ,समाज्यामध्ये मानाचेस्थान दिले जात नाही तोपर्यत ही चळवळ सतत चालू राहिल.

**संदर्भ साधने:-**

१) फडके भालचंद्र **'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य'** प्रचार प्रकाशन कोल्हापूर,जून १९१९ प्रथम आवृती,, पृष्ठ ८५

२) कुलकर्णी कुसुम **'प्रबोधन पर्व'** सिंहवानी प्रकारात कोल्हापूर, व्दितीय आवृत्ती२००२, पृष्ठ १२५

३)खरात शंकरराव (संपादक)**'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे'** इंद्रयणीसाहित्य,१९९०,पुणे, पृष्ठ ०५

४) भोळे भास्कर लक्ष्मण, **'बदलता महाराष्ट्र'**, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी,सातारा,पहिली आवृत्ती, २००३, पृष्ठ ३

५) डॉ.फडके भालचंद्र **'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य'** प्रचार प्रकाशन,कोल्हापूर, जुन १९८९, प्रथम आवृत्ती, पृष्ठ ८५

६) अरूण कांबळे (संपादक) **'जनता पत्रातील लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकर'**पॉप्युलर प्रकारात, मुंबई, पहिली आवृत्ती १९९२, पृष्ठ १४६,१४७

७) जोशी लक्ष्मण शास्त्री(प्रमुख संपादक)**'मराठी विश्वकोश'** खंड७ महाराष्ट्र राज्यसाहित्य सांस्कृतीक मंडळ, मुंबई १९७७, पृष्ठ ६६०